॥ श्री ॥

# श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज ट्रस्ट, पुणे. A-१६

**कार्यालय :** ५७६ गुरुवार पेठ, पुणे. ४११०४२ आणि ४१७, ४१९, ५०० घोरपडे पेठ, पुणे. ४११०४२

Website : www.ssksamajtrust.com Email : ssksamajtrust@gmail.com




## ➪ वार्षिक सर्वसाधारण सभा ➪

### ३० नोव्हेंबर २०२४, सायं. ६ वाजता

## ◆ विश्वस्त कार्यकारिणी व पदाधिकारी ◆

| पद | नाव |
|---|---|
| अध्यक्ष- | श्री. विनेश प्रकाश झाड, ME Mechatronics |
| उपाध्यक्ष - | श्री. मेघशाम मोतीराम झाड, Jewellery Business, |
| कार्यवाह - | श्री. मनोज मनोहर काटवे, ME Mech/Auto, Software Engg. |
| उपकार्यवाह - | श्री. योगेश विजय साधू, MTech Software |
| खजिनदार - | सौ. मोनाली मनीष खेरुड, Wholesale Cloth Merchant |
| हिशोब तपासणीस - | सौ. अंजली निलेश खत्री, CA, CISA, |
| सदस्य - | श्री. गणेश किरण खानापूरे, PA to Politician |
| सदस्य - | श्री. अजय नंदकुमार चौधरी, Businessman |
| सदस्य - | श्री. दत्तात्रय रामचंद्र धोंडाळे, Real Estate Broker |
| सदस्य - | श्री. ऋषिकेश राजू कोल्हापुरे, Proprietor Fitness Health Club |
| सदस्य - | श्री. किरण देविदास बुरबुरे, MNC Process Expert, Isha Foundation |
| सदस्य - | श्री. आकाश अंकुश कोल्हापुरे, Real Estate Broker, Trishakti Foundation |
| सदस्य - | श्री आदित्य जितेंद्र झाड, LLB, Crime Specialist |
| सदस्य - | डॉ. सौ. शुभांगी प्रवीण वाळवेकर, PhD. MBA. Director IMBR Organisation |
| सदस्य - | सौ. अनुराधा योगेश चव्हाण, Plating Workshop, Women empowerment. |

## ◆ संस्थेचे सन्माननीय आधारस्तंभ ◆

**श्री अरविंदसा वाळवेकर**
**श्री बाळासाहेब झाड**
**श्री विजयसा कोल्हापुरे**
**श्री लक्ष्मणसा पवार**
**श्री बंडुसा वाळवेकर**
**श्री अशोकसा चव्हाण**
**श्री अनिलसा वाळवेकर**
**श्री शंकरसा कटारे**
**श्री संजयसा कोल्हापुरे**
**श्री अनिलसा कुक्कर**

# ❖ वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ❖

## (फक्त सभासदांसाठी)

माननीय सभासद बंधु-भगिनींनो,

आपल्या संस्थेची वार्षिक सर्वसाधरण सभा शनिवारी, दि. ३० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.०० वाजता वाळवेकर लौन्स पुणे सातारा रोड पुणे ४११००९ येथे, होणार आहे. तरी सर्व समाज बांधव सभासदांनी या वार्षिक सर्वसाधारण सभेला वेळेवर उपस्थित रहावे व सभेच्या कामकाजामध्ये सहभाग घ्यावा.

१. गणसंख्येअभावी सभा तहकुब झाल्यास अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी घेण्यात येईल. या सभेस गणसंख्यापुर्तीचे बंधन राहणार नाही. संस्थेच्या वेबसाईटवर आमच्या दोन्ही वर्षाचे आर्थिक लेखापरिक्षक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक, २0२३ वार्षिक सर्व साधारण सभेची इतिवृत्तांत दिनांक २२ नोव्हेंबर रोजी उपलब्ध होईल. तसेच अहवालाची PDF प्रसारित करण्यात येईल.

२. घटनेप्रमाणे सभास्थळी प्रत्येक सभासदाने आपले नाव रजिस्टरमध्ये लिहून सही करणे आवश्यक आहे.

३. फक्त वार्षिक सर्वसाधरण सभेच्या विषयांबाबत सूचना व शंका समाधान याकरिता लेखी अर्ज संस्थेच्या अधिकृत इमेल ssksamajtrust@gmail.com किंवा ९०४९८१७३५५ नंबरवर व्हाट्सअँप (WhatsApp) द्वारे दि. २७ नोव्हेंबर २०२४ अखेर पर्यंत द्यावयात.

४. कोणत्याही वैयक्तिक सुचना व शंका समाधानाबाबत विचार केला जाणार नाही. तसेच अहवाल वर्ष कालावधीच्या प्रश्नांवर चर्चा केली जाईल, जुन्या कालावधीचे प्रश्न विचारत घेतले जाणार नाहीत.

५. फक्त संस्थेच्या सभासदांनाच या सभेत भाग घेता येईल. अध्यक्षांच्या परवानगीने आपले विचार मांडता येतील. याची कृपया नोंद घ्यावी.

समाजहिताशी संबंधित असेच प्रश्न मांडून त्यावर आटोपशीर चर्चा करावी. तेच तेच विषय अथवा विचारांची पुनरावृत्ती टाळून आम्हाला सहकार्य करावे. जेणेकरुन सभेचा वेळ वाया न जाता जास्तीत जास्त सभासदांना आपले विचार व्यक्त करण्याची संधी मिळेल.

## ◆ वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषय व ठराव ◆

विषय क्र. १ - दि. 11 जून २०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतीवृतांत वाचून कायम करणे.

विषय क्र. २ - दि. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षणाचा अहवाल,नफा-तोटापत्रक, ताळेबंद संमत करणे.

विषय क्र. ३ - आर्थिक वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ चे अंदाजपत्रक संमत करणे.

विषय क्र. ४ - आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीकरिता लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.

विषय क्र. ५ - न्यायालयीन कामकाजाबाबत माहिती, चर्चा व ठराव.

विषय क्र. ६ - अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा व निर्णय.

## ◆ विषय क्र. १ : इतिवृत्तांत सर्व-साधारण सभा ११ जून २०२३

सायं. ५.०० : नियोजित वेळेप्रमाणे सभेस सुरुवात झाली, सर्व-साधारण सभेचे सूत्र संचालन करण्यास सौ शीतल काटवे यांना आमंत्रण देण्यात आले. गणसंख्येअभावी सभा अर्धा तास पुढे ढकलण्यात आली.
सायं. ५.३० : सभेची सुरुवात झाली. ह्या सभेला गणसंख्येचे बंधन नाही असे जाहीर करण्यात आले.

श्री सहस्त्रार्जुन नागरी सहकारी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष श्री अशोक चव्हाण यांचे हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज ट्रस्ट A १६ संस्थेला वेळोवेळी सहकार्य करल्याबद्दल श्री विजय कोल्हापुरे, श्री संजय कोल्हापुरे, श्री अनिल वाळवेकर, श्री शंकर कटारे यांचा सत्कार करण्यात आला.

सर्व दिवंगत समाज बांधवांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

मागील सभेचा (२० मार्च २०२२) इतिवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.
अनुमोदन : श्री मनीष खेरुड सूचक : श्री शंकर कटारे

२२.४० आर्थिक वर्ष २०२२-२०२३ चा आर्थिक हिशोब सौ. मोनाली खेरुड (खजिनदार) वाचून दाखविण्यात आला. हिशोब तपासनीस सौ. अंजली खत्री यांनी हिशोब सविस्तर समजावून सांगितलला. कॅश व्यवहार टाळून जवळपास सर्व खर्च हे ऑनलाईन पद्धतीने केले आहेत, हे जाहीर करून त्याबद्दल संस्थेने पुढाकार घेतल्याबद्दल आनंद व्यक्त केला. हयामुळे लेखापरीक्षण खूप सोयीचे झाले.

श्री विनेश झाड यांनी युको बँकेतील व्यहाराबद्दल अधिक माहिती दिली.

लेखापरीक्षण अहवालबद्दल श्री निखिल आरसीध्द यांनी लेखा परीक्षण अहवाल (जमा-खर्च पत्रक, ताळेबंद पत्रक) हा श्री विनेश झाड कार्यकारणी व श्री मनोज आरसीध्द यांचा हिशोब एकत्रित होऊनच पूर्ण केला जाईल, असे सूचित केले. ठराव मंजूर करण्यात आला.
अनुमोदन : श्री अरुण पवार सूचक : श्री विजय कोल्हापुरे

२०२३-२४ चे अंदाज पत्रक मंजूर करण्यात आले.
अनुमोदन : श्री राजेश कटारे सूचक : श्री किशोर चौधरी

श्री मनोज काटवे यांनी बदल अर्ज क्रमांक १७६२/२०२२ बद्दल अधिक माहिती दिली. श्री लक्ष्मण पवार ह्यांनी सर्व विषय अनेक गुंतागुंतीचे आहेत. ह्यासाठी सर्वांनी वेळ देणं आवश्यक आहे. असे सूचित केले. श्री मनोज काटवे यांनी श्री निखिल आरसीध्द ह्यांना दोनीही कार्यकारणी एकत्र बोलावून मिटिंग करावी अशी विनंती केली.

बदल अर्ज क्रमांक १७६२/२०२२ ह्या बदल अर्जावर मा. धर्मादाय कार्यालयात कामकाज चालू ठेवावे. असा ठराव मंजूर करण्यात आला.
अनुमोदन : श्री दिलीप भांडगे सूचक : श्री शंकर कटारे

श्री मनोज काटवे ह्यांनी मा. धर्मादाय कार्यालयातील प्रकरण क्रमांक ६४/२०२२ मधील आदेशाची सविस्तर माहिती दिली. तदनंतर समाजाच्या महत्वाच्या कोर्ट केसेस ची माहिती दिली.

श्री विनेश झाड ह्यांनी आळंदी जागेबद्दल सद्य स्थितीची माहिती दिली.

श्री ऋषिराज कोसंदर यांनी हिंदू समाज व समाजातील सद्य परिस्थितीवर माहिती दिली.

सौ शितल काटवे ह्यांनी श्री अरविंद वाळवेकर याचे सभेला हॉल उपलब्ध करून दिला याबद्दल व सहकार नगर पोलीस स्टेशन मधील कॉन्स्टेबल यांनी सुरक्षा प्रदान केल्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले.

सभा समाप्तीची घोषणा केली.

## ❖ विषय क्र. २ : २०२३-२४ आर्थिक वर्षाचा ऑडिट रिपोर्ट

REPORT OF AN AUDITOR RELATING TO ACCOUNTS AUDITED
UNDER SUB-SECTION (2) OF SECTION 33 & 34 AND RULE 19 OF
THE MAHARASHTRA PUBLIC TRUSTS ACT

Registration No.:- A-16
Name of the Public Trust:- Shree Somvanshiya Sahastrarjun Kshatriya Samaj (Trust) Pune
Office- 'Kshatriya Bhavan' , 576, Guruvar Peth, Pune 411042
For the year ending :- 3/31/2024

**In Respect of Ujjivan Small Finance Bank and UCO banK**

a) Whether accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the Act and the rules ;.......... Yes

b) Whether receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts;.......... Yes

c) Whether the cash balance and vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts;.......... Yes

d) Whether all books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by the auditor were produced before him;.......... Yes

e) Whether a register of movable and immovable properties is properly maintained, the changes therein are communicated from time to time to the regional office and the defects and inaccuracies .......... Yes mentioned in the previous audit report have been duly complied with;

f) Whether the manager or trustee or any other person required by the auditor to appear before him did so and furnished the necessary.......... Yes information required by him;

g) Whether any property or funds of the Trust were applied for any object or purpose other than the objects or purpose of the Trust;.......... No

h) The amount of outstanding for more than one year .......... and the amountswritten off, if any .......... No

i) Whether tenders were invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 5000/-. .......... NA

j) Whether any money of the public trust has been invested contrary to the provisions of Section 35.......... No

k) Alianation, if any of the immovable property contrary to the provisions of Section 36 which have come to the notice of the auditor;.......... No

l) All cases of irregular, illegal or improper expenditure or failure or omission to recover monies or other property belonging to the public trust or of loss or waste of money or other.......... No property thereof and whether such expenditure, failure, omission loss or waste was caused in consequence of breach of trust or misapplication or any other misconduct on the part of the trustees or any other person while in the management of the trust.

m) Whether the budget has been filed in the form provided by rule 16 A;.......... Yes

n) Whether the maximum and minimum number of the trustees is maintained.......... Yes

o) Whether the meetings are held regularly as provided in such instrument.......... Yes

p) Whether the minutes books of the proceedings of the meeting are maintained.......... Yes

q) Whether any of the trustees has any interest in the investment of the trust.......... No

r) Whether any of the trustees is a debtor or creditor of the trust;.......... Yes

M. R. Mate & Associates
FRN No. 140439W
Chartered Accountants

s) Whether the irregularities pointed out by the auditors in the accounts of the previous year have been duly complied with by the trustees during the period of audit .................................... NA

t) Any special matter which the auditor may think fit or necessary to bring to the notice of the Deputy or Assistant Charity Commissioner; .................................... Yes

**i)We have not audited the entire financial statements of the Trust.**
**ii)We have audited only 2 bank accounts by the Trust and we have conducted the partial audit.**
**iii)Cases ongoing with charity commissioner regarding the Authorized trustees of the trust.**
**iv)Trustte's have incurred expenses on behalf of the trust from their persoal accounts to comply with order of Charity commissioner.**
**v)Trust has incorporated Land & other assets received as donation in kind in this financial year as trust was inadvertently not accounted for it in earlier years in which donation was actually received.**

For M.R.MATE & ASSOCIATES
Chartered Accountant

M. R. Mate
Date :- 21-10-2024
UDIN :- 24037186BKDZJL1720

M. R. Mate & Associates * Chartered Accountants * FRN No. 140439W

## आर्थिक हिशोब संबंधी महत्वाचे :

-आम्ही मार्च २०२२ साली आल्यापासून, संपलेल्या आर्थिक वर्षाचा हिशोब सभासदांसमोर मांडत आहोत. मागील वर्षी २०२२-२३ चा हिशोब ११ जुन २०२३ रोजीच्या सभे मध्ये दिला होता. याही वर्षी आता संपलेल्या २०२३-२४ ह्या आर्थिक वर्षाचा आमचा जमा-खर्च हिशोब आम्ही तुम्हाला देत आहोत.

-परंतु श्री मनोज आरसीध्द कार्यकारणी प्रत्येक वर्षी मागील वर्षाच्या आधीच्या वर्षाचा हिशोब देऊन दरवर्षीचा हिशोब करायला २ वर्षे घेतात. त्यांनी ३० सप्टेंबर २०२४ रोजी घेतलेल्या सभेत २०२२-२३ चा हिशोब दिला. जो आम्ही यांच्या आधी १५ महिने (११ जून २०२३ रोजी) दिला आहे. असे हे कित्येक वर्ष करत आहेत. तरी समाजातील जाणकार / अभ्यासू सभासदांनी याची नोंद द्यावी हि विनंती.

- तसेच संस्थेच्या एकाच पॅन कार्ड नंबरवर दोन्ही कार्यकारणीचे व्यवहार होत असण्याने दोन्ही कार्यकारणीचे हिशोब एकत्र होऊनच पूर्ण हिशोब मा. धर्मदाय आयुक्त कार्यालयात जमा करणे कायद्याने गरजेचे असताना त्यांचा अर्धवट ऑडिट रिपोर्ट जमा करणे संस्थेस अडचणीचे आणू शकते. तरी आम्ही आमच्या कार्यकारिणीने केलेले हिशोब यांच्या आधीच समाज्याला देत असल्याने व त्यांचा हिशोब १ वर्षापेक्षा जास्त उशिरा मिळत असल्याने त्यांनी एकत्र हिशोब करणे गरजेचे आहे किंवा आम्हास त्यांनी हिशोब वेळेवर दिल्यास आम्ही तो एकत्र करू शकतो.

## आवाहन:

परंतु याच्या काही लोकांच्या आडमुठेपणामुळे किंवा अज्ञानामुळे संस्थेचे मोठे नुकसान होणार हे दिसत आहे. तरी त्यांच्या कार्यकारिणीतील समजदार व्यतींनी याबाबत संस्थेच्या हिताचं विचार करून निर्णय घ्यावा, असे आम्ही आवाहन करतो. काही अडचण आल्यास आम्ही जबाबदार नाही.

Name of the Trust | **Shree Somvanshiya Sahastrarjun Kshatriya Samaj (Trust) Pune**
Office- 'Kshatriya Bhavan' , 576, Guruvar Peth, Pune 411042

Registration no.: A-16

**BALANCE SHEET AS AT 31.3.2024**

**In Respect of Ujjivan Small Finance Bank and UCO bank only**

| FUNDS AND LIABILITIES | | RS. | PROPERTY AND ASSETS | | RS. |
|---|---|---|---|---|---|
| TRUSTS FUNDS OR CORPUS | | | IMMOVEABLE PROPERTIES **Schedule No.09** | 10.00 | 10.00 |
| Balance as per last | | | (at cost)(suitably classified | | |
| Balance Sheet | 0.00 | | giving mode of valuation ) | | |
| adjustments / | | | Addition or deduction (Including | 0.00 | |
| Additions during the Yea **Schedule No.10** | 30.00 | | those for depreciation) if any | 0.00 | |
| | | | during the year | | |
| | | 30.00 | INVESTMENTS :- | | 5,05,762.00 |
| | | | (Fixed deposits with UCO Bank) | | |
| OTHER EARMARKED FUNDS | | | | | |
| (Created under the | | | | | |
| Provisions of the Trust | | | MOVABLE PROPERTIES | | 20,363.75 |
| Deed or Scheme or | | | Balance as per last | 27,125.00 | |
| out of the Income ) | | | Balance Sheet | | |
| Depreciation Fund | | | Additions during the year | 20.00 | |
| Sinking Fund | | | Less - Sales during the year | | |
| Reserve Funds | | 0.00 | Depreciation upto date | 6,781.25 | |
| Any other fund | | 0.00 | LOANS(Secured or Unsecured) | | |
| Conditional Donation | | | (Good / doubtful) | | |
| | | | Loan Scholarships | | |
| | | | Other Loans | | 0.00 |
| LOANS (Secured or Unsecured) | | | ADVANCES :- | | |
| | | | Deposits | | 0.00 |
| From Trustees | | 0.00 | To Others | | 0.00 |
| From Others | | 0.00 | To Tax deducted at source | | 0.00 |
| PROVISIONS | | | | | |
| For Audit Fees | | 11,800.00 | Income Outstanding | | |
| For Tax | | 0.00 | Rent | | 0.00 |
| For Expenses | | | | | |
| Sundry Creditors **Schedule No.07** | | 5,76,931.15 | CASH AND BANK BALANCE **Schedule No.08** | | |
| | | | a) In Current A/c | 9,05,562.55 | |
| | | | b) with the trustee | 730.00 | |
| | | | c) with the manager | 0.00 | 9,06,292.55 |
| INCOME AND EXPENDITURE ACCOUNT | | | INCOME AND EXPENDITURE ACCOUNT | | |
| Balance as per last | | | Balance as per last | | |
| Balance Sheet | 9,52,998.55 | | Balance Sheet | | |
| Less :- Appropriation, if any | 0.00 | | Less :- Appropriation , if any | | |
| Add :- Surplus} as per | | | Add :- Deficit } as per | | |
| Less:- Deficit } Income | 1,09,331.40 | | Less:- Surplus} Income | | |
| & Expenditure a/c | | | & Expenditure a/c | | |
| | | 8,43,667.15 | | | |
| TOTAL Rs. :- | | 14,32,428.30 | TOTAL Rs. :- | | 14,32,428.30 |

**NOTE :** **Above Financial Statements are related to only two Bank accounts of the trust.**

As per our report of even date

For M.R. Mate Associates

Chartered Accountants

M. R. Mate & Associates * Chartered Accountants * FRN No. 140439W

M.R.Mate
(Proprietor)
Date : 21/10/2024
UDIN 24037186BKDZJL1720

For and on Behalf of Shree Somvanshiya

Sahastrarjun Kshatriya Samaj (Trust) Pune

TRUSTEE

PRESIDENT SECRETARY TREASURER

SHRI SOMVANSHIYA SAHASTRARJUN KSHATRIYA SAMAJ TRUST, PUNE

Name of the Public Trust | **Shree Somvanshiya Sahastrarjun Kshatriya Samaj (Trust) Pune** | Registration No.:-- A-16

Office- 'Kshatriya Bhavan' , 576, Guruvar Peth, Pune 411042

**INCOME AND EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR ENDING 31.3.2024**
**In Respect of Ujjivan Small Finance Bank and UCO bank only**

| EXPENDITURE | RS. | RS. | INCOME | RS. | RS. |
|---|---|---|---|---|---|
| To Expenditure in respect | | | | | |
| of properties | | | By Rent (Accrued) | 0.00 | |
| Rates,Taxes,Cesses | | 0.00 | (Realized) | 0.00 | 0.00 |
| Repairs and Maintenance | | | By Interest (Accrued) | | |
| Insurance | | | (Realized) | | |
| Depreciation (by way of | | 0.00 | | | |
| provision or adjustments) | | | On securities | 0.00 | |
| Other Expenses | | | On loans | 0.00 | |
| | | | On Bank Accounts | | |
| To Establishment Expenses **Schedule No.02** | | 69,088.50 | F.D. | 58,185.00 | |
| | | | SAVINGS **Schedule No.05** | 14,206.00 | |
| To Professional fees **Schedule No.04** | | 1,40,000.00 | | ------------------- | 72,391.00 |
| | | | By Interest on Income Tax Refund | | 0.00 |
| To Legal Expenses | | 18,120.65 | By Donation, in Cash or Kind | | |
| | | | a)From other trusts | 0.00 | |
| To Audit Fee | | 11,800.00 | b)From others **Schedule No.04** | 0.00 | 0.00 |
| To Contribution and Fees | | 0.00 | | | |
| | | | By Grants from Govt. | | 0.00 |
| To Amount Written Off | | | | | |
| a) Bad Debts | | | | | |
| b)Loan Scholarships | | 0.00 | By Income from Objects of the Trust | | 3,79,859.00 |
| c)Irrecoverable rents | | 0.00 | **Schedule No.03** | | |
| d)Other Items (TDS) | | 0.00 | | | |
| To Miscellaneous Expenses | | | | | |
| To Depreciation **Schedule No.06** | | 6,781.25 | | | |
| | | | By Transfers from Reserve | | 0.00 |
| To Expenditure on Objects of | | | | | |
| the Trust | | | | | |
| a) Religious | | 0.00 | | | |
| b) Educational | | 0.00 | By Deficit carried over | | |
| c) Medical Relief | | 0.00 | to Balance Sheet. | | 1,09,331.40 |
| d) Social **Schedule No.01** | | 3,15,791.00 | | | |
| e) Other Charitable Objects | | 0.00 | | | |
| To Surplus Carried over to | | | | | |
| Balance Sheet | | | | | |
| | | ------------------- | | | ------------------- |
| TOTAL Rs. :- | | 5,61,581.40 | TOTAL RS :- | | 5,61,581.40 |
| | | =========== | | | =========== |

**NOTE :** **Above Financial Statements are related to only two Bank accounts of the trust.**

As per Our report of even date

For M.R. Mate Associates

Chartered Accountants

M. R. Mate & Associates
FRN No. 140439W
Chartered Accountants

M.R.Mate
(Proprietor)
Date :- 21/10/2024
UDIN 24037186BKDZJL1720

For and on Behalf of Shree Somvanshiya
Sahastrarjun Kshatriya Samaj (Trust) Pune

TRUSTEE

PRESIDENT | SECRETARY | TREASURER

SHRI SOMVANSHIYA SAHASTRARJUN KSHATRIYA SAMAJ TRUST, PUNE

**Shree Somvanshiya Sahastrarjun Kshatriya Samaj (Trust) Pune**

**In Respect of Ujjivan Small Finance Bank and UCO bank only**

Schedules forming part of Balance Sheet

and Profit & Loss a/c for the year ended 31.3.2024

**SCHEDULE NO.1** **Expenses on Objects of the Trust**

| Sr. No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| A | **AGM Expenses** | |
| | AGM Newspaper Notice Expense | 10,920.00 |
| | AGM Video Photograpy Expenses | 9,000.00 |
| | Annual Report Design and Flex Printing | 5,000.00 |
| | Lawn Rent-AGM | 5,100.00 |
| | Printing Expenses -AGM | 1,450.00 |
| | Snacks & Tea for AGM | 3,950.00 |
| | **Total(A)** | **35,420.00** |
| B | **Wadhuwar Melava Expenses** | |
| | Bouncers Security Expenses | 3,000.00 |
| | Catering Expenses | 1,22,100.00 |
| | Chairs/tables rental | 10,000.00 |
| | Decoration Expenses | 15,000.00 |
| | Flex Printing | 5,500.00 |
| | Function Expenses | 5,180.00 |
| | Internet & Extention Charges | 4,000.00 |
| | Labour Charges | 3,200.00 |
| | Lawn Rental-Wadhuvar Melava | 44,601.00 |
| | Light & Sound Expenses - Wadhu Var Melava | 9,000.00 |
| | Software Expenses | 1,500.00 |
| | Tea for Wadhuvar Meeting at MCCI | 520.00 |
| | Wadhu Var Melava Pustika & Badge- Printing Expenses | 55,000.00 |
| | **Total (B)** | **2,78,601.00** |
| C | **Yuvti Sanghatana Programme Expenses** | |
| | Consumables Items | 420.00 |
| | Light & Sound Exp | 1,350.00 |
| | **Total (C )** | **1,770.00** |
| | | |
| | **Total (A+B+C)** | **3,15,791.00** |

श्री. सो. स. क्षत्रिय समाज ट्रस्ट, पुणे

M. R. Mate & Associates
FRN No. 140439W
Chartered Accountants

**SCHEDULE 2 :-** **ESTABLISHMENT EXPENSES**

| Sr. No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | Miscellaneous Expenses | 1,005 |
| 2 | Postage & Courior | 289 |
| 3 | Website Development & Maintainance Expenses | 51,999 |
| 4 | Travelling Expenses | 15,000 |
| 5 | Administrative expenses | 796 |
| | **Total** | **69,088.50** |

**SCHEDULE 3 :-** **INCOME FROM OBJECTS OF THE TRUST**

| Sr. No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | WADHU VAR MELAVA REGISTRATION FEES | 3,79,859.00 |
| | **Subtotal** | **3,79,859.00** |

**SCHEDULE 4 :-** **Professional Fees**

| Sr. No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | Advocate Thavare | 40,000.00 |
| 2 | Swami Advocate | 75,000.00 |
| 3 | Adv Aditya Zad | 20,000.00 |
| 4 | Adv. Siddharth Rathod | 5,000.00 |
| | **Subtotal** | **1,40,000.00** |

**SCHEDULE 5 :-** **Interest and dividend**

| Sr. No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| | **Saving Bank Interest** | |
| 1 | UJJIVAN SMALL FINANCE BANK LTD -53138 | 8,154.00 |
| 2 | UCO BANK | 6,052.00 |
| | **Subtotal** | **14,206.00** |
| | | |
| | **Interest on Fixed Deposits** | |
| 1 | UCO BANK | 58,185.00 |
| | **Subtotal** | **58,185.00** |
| | | |
| | **Total (A+B)** | **72,391.00** |

M. R. Mate & Associates
FRN No. 140439W
Chartered Accountants

**Shree Somvanshiya Sahastrarjun Kshatriya Samaj (Trust) Pune**

**In Respect of Ujjivan Small Finance Bank and UCO bank only**

Schedules forming part of Balance Sheet

and Profit & Loss a/c for the year ended 31.3.2024

**SCHEDULE 7 :-** **Sundry Creditors**

| Sr. No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | Vinesh Zad | 5,10,048.00 |
| 2 | Monali Kherud | 54,799.00 |
| 3 | Manoj Katwe | 1,914.15 |
| 4 | Shital Katwe | 650.00 |
| 5 | Meghshyam Zad | 520.00 |
| | Dr. Sanjay Kshatriya | 9000.00 |
| | **Total** | **5,76,931.15** |

**SCHEDULE 8 :-** **CASH & BANK BALANCE**

| Sr. No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | Cash | 730.00 |
| | **Subtotal** | **730.00** |
| 2 | UCO Bank - 07080110002377 | 1,93,726.11 |
| 3 | UJJIVAN SMALL FINANCE BANK LTD A/c No.4408110110053138 | 7,11,836.44 |
| | **Subtotal** | **9,05,562.55** |
| | | |
| | **Total** | **9,06,292.55** |

| SCHEDULE 9:- | Immovable Properties | |
|---|---|---|
| **Sr. No.** | **Particulars** | **Amount** |
| 1 | Land (S No,921/4,6 Plot No.7, 155 ft *55 ft , Charoli Gaon,Pune-Alandi Road, Pune-412105.) | 10.00 |
| | **Total** | **10.00** |

**SCHEDULE 10:-** **Trust Fund**

| Sr. No. | Particulars | Donor Name | Notional Value |
|---|---|---|---|
| 1 | Metal Cupboard | Mr.Burbure | 10.00 |
| 2 | Inkjet Printer | Mr.Burbure | 10.00 |
| 3 | Land ( 155 ft x 55 ft) | Ms Pushpavatibai Sakharamsa Katwe | 10.00 |
| | **Total** | | **30.00** |

सध्या आळंदीच्या जागेची व इतर मालमत्ताची किंमत ऑडिट कामाकरिता प्रत्येकी फक्त १० रुपये गृहीत समजली आहे. तरी खरी मूल्यांकन किंमत काढल्यानंतर ती पुढील हिशोबात घेण्यात येईल. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

SCHEDULE 6 :- FIXED ASSETS AND DEPRECIATION

| Sr.No. | Particulars | W D V as on 01-04-2023 | Before sept | After Sep | Rate % | Depreciation | W D V as on 31-03-2024 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| B) | **Movable Assets** | | | | | | |
| 1 | Matrimony Software | 27,125.00 | 0.00 | 0.00 | 25.00 | 6,781.25 | 20,343.75 |
| 2 | Kapat | 0.00 | 10.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 10.00 |
| 3 | Inkjet Printer | 0.00 | 10.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 10.00 |
| | | | | | | | |
| | **Total** | **27,125.00** | **20.00** | **0.00** | | **6,781.25** | **20,363.75** |

श्री. सो. स. क्षत्रिय समाज ट्रस्ट, पुणे

M. R. Mate & Associates * Chartered Accountants * FRN No. 140439W

THE MAHARASHTRA PUBLIC TRUSTS ACT, 1950

SCHEDULE IX C

Statement of income liable to contribution
for the year ending 31.03.2024

Name of Public Trust: **Shree Somvanshiya Sahastrarjun Kshatriya Samaj (Trust) Pune**
Office- 'Kshatriya Bhavan' , 576, Guruvar Peth, Pune 411042

Registration No:- A-16

| Particular | Rs. | Rs. |
|---|---|---|
| I] INCOME AS SHOWN IN THE INCOME AND EXPENDITURE A/C [SCHEDULE IX] | | 4,52,250.00 |
| II] ITEMS NOT CHARGEABLE TO CONTRIBUTION UNDER SECTION 58 & RULE 32 :- | | |
| 1) Donations received from other Public Trusts & Dharmadas | 0.00 | |
| 2) Grants received from Government & local authorities | 0.00 | |
| 3) Interest on Sinking or Depreciation Fund | | |
| 4) Amount spent for the purpose of secular education | 0.00 | |
| 5) Amount spent for the purpose of medical relief | 0.00 | |
| 6) Amount spent for the purpose of veterinary treatment of animals | | |
| 7) Expenditure incurred from donations for relief of distress caused by scarcity, draught, flood, fire or other natural calamity | 0.00 | |
| 8) Deductions out of income from lands used for agricultural purposes | | |
| a) Land Revenue & Local Fund Cess | | |
| b) Rent payable to superior landlord | | |
| c) Cost of production, if lands are cultivated by trust | | |
| 9) Deductions out of income from land used for non-agricultural purposes | | |
| a) Assessment, Cesses & other Government or Municipal taxes | 0.00 | |
| b) Ground rent payable to the superior landlord | | |
| c) Insurance premia | | |
| d) Repairs at 10% of gross rent of building | | |
| e) Cost of collection at 4% of gross rent of buildings let out | | |
| 10) Cost of collection of income or receipts from | | |

M. R. Mate & Associates
FRN No. 140439W
Chartered Accountants

| | | |
|---|---|---|
| securities, stocks, etc. at 1% of such income<br>11) Deductions on account of repairs in respect of buildings not rented & yielding no income at 10% of the estimated gross annual rent | | - |
| Gross Annual Income chargeable to contribution RS.<br>(Contribution payable Rs. 0 ) | | 4,52,250.00 |

Certified that while claiming deductions admissible under the above Schedule, we have not claimed any amount twice either wholly or partly, against any of the items mentioned in the Schedule which have the effect of double-deduction.

M. R. Mate & Associates FRN No. 140439W Chartered Accountants

Date :-

For and on Behalf of Shree Somvanshiya Sahastrarjun Kshatriya Samaj (Trust) Pune

21/10/2024

TRUSTEE

श्री. सो. स. क्षत्रिय समाज ट्रस्ट

As per Our report of even date

For M.R. Mate Associates

Chartered Accountants

M.R.Mate

(Proprietor)

M R MATE & ASSOCIATES
CHARTERED ACCOUNTANTS
Mate wada, 1166 Budhawar Peth,
Shanipar Mandai Road, Near Jilbya Maruti Mandir, PUNE 411 002. INDIA
TELE: +91-20-24455080
E-MAIL: infomrmca@gmail.com

# DONATION CERTIFICATE FOR FY 2023-24

This is to certify that, **Shree Somvanshiya Sahastrarjun Kshatriya Samaj (Trust) Pune** has not received any donations & Donation in kind towards corpus fund for articles & Land Received is Rs.30/- in the financial year 2023-24.

Place : Pune
Date : 21/10/2024

For M. R. Mate & Associates
Chartered Accountants
FRN -140439W

M. R. Mate
M. No. – 037186
UDIN:- 24037186BKDZJL1720

## ◆ विषय क्र. ३ : अंदाज पत्रक  आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि २०२४-२५

| | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---:|---:|
| विषय | रुपये | रुपये |
| वारकरी भजन , कीर्तन क महाप्रसाद | ३५,००० | ४५,००० |
| शिक्षण मंडळ विविध उपक्रम | ५५००० | ७५,००० |
| युवती मंडळ विविध उपक्रम | ५०,००० | ६५,००० |
| अखिल भारतीय वधुवर मेळावा | ७,५०,००० | ८,५०,००० |
| न्यायीक खर्च | २,००,००० | १,५०,००० |
| वार्षिक सर्व साधारण सभा | ४०,००० | ४०,००० |
| विविध सामाजिक/सांस्कृतिक  वार्षिक कार्यक्रम | २,००,००० | २,५०,००० |
| गरजू सभासदांना आर्थिक मदत | १,७५,००० | २,००,००० |
| सभासद खानेसुमारी | १५,००० | १०,००० |
| पगार | १,००,००० | १,७५,००० |
| **एकूण** | **१६,२०,०००** | **१८,६०,०००** |

## ✤ कार्यकारणीचे मनोगत ✤

नमस्कार सभासद बंधू-भगिनींनो,

पुणे समाजाच्या सद्य परिस्थितीचा आढावा देण्यासाठी आम्ही कार्यकारणी मनोगत द्वारे आपल्या ग्रामसभेची सध्याची परिस्थिती समजावण्याचा प्रयत्न करीत आहोत.

**श्री मनोज आरसीध्द यांच्याद्वारे घेण्यात आलेल्या घटनाबाह्य, बेकायदेशीर, अनैतिक घेतलेल्या निवडणुकीबद्दल :**

आपल्या सर्वांना माहीतच असेल कि यांचे बरखास्त कार्यकारणीकडून १० सप्टेंबर २०२३ रोजी तथाकथित निवडणूक घेतल्याचा देखावा करण्यात आला. ह्या निवडणुकीमध्ये कायदेशीर, सामाजिक व नैतिक स्तरावर अनेक त्रुटी आहेत. आम्ही त्यातील त्रुटी समाजातील अनेक बांधवांच्या लक्षात आणून दिलेल्या आहेत. यांनी निवडणूक हि सभासदांची संपूर्ण दिशाभूल करून व समाजाचा पैसा खर्च करून वैयक्तिक स्वतः चा कार्यक्रम राबवला. यातून मार्ग काढण्यासाठी अनेक चर्चा देखील घडवून आणल्या. परंतु आम्हाला सांगायला खेद होतो कि प्रत्येक वेळी काहीनाकाही कारण काढून अर्धवट चर्चा, विना मुद्द्यांचे भरकटलेले विषय, कोणत्याही ठोस निर्णयाशिवाय चर्चेस विराम, त्यामुळे काहीही समाजोपोयोगी ठोस निर्णय होऊ शकला नाही. त्यामुळे नाईलाजाने आम्हाला मा. धर्मादाय कार्यालयात या बाबतीत दाद मागावयास भाग पडले. तथापि आम्ही समाजासमोर ह्या त्रुटी समोर पुन्हा एकदा आणीत आहोत.

१. पुणे समाजातील वाद विवाद हे मागील अनेक वर्षे प्रलंबित आहेत. त्यामुळे पारदर्शी निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी मा. धर्मादाय कार्यालयातून निवडणुकीसाठी रीतसर परवानगी आणि त्याजोगे निरीक्षक मागणी करण्ये अत्यंत आवश्यक होते. परंतु असा कोणताही प्रयत्न करण्यात आलेला नाही. मा. धर्मादाय आयुक्त यांची परवानगी घेतलेलीच नव्हती, किंबहुना असा अर्जही केल्याचे बोर्डावर नोंद नाही, निरीक्षक मागणी केलेलीच नव्हती. जर परवानगी मिळाल्याचे आणि निरीक्षक मागणी केलेली असल्यास, ती परवानगी आणि मागणी अर्ज अजून लपवून ठेवण्याचे प्रयोजन हे नक्कीच समाजहिताचे नाही. या उलट समाज्यात मा. धर्मादाय आयुक्त यांची परवानगी घेतली आहे व निवडणुकीसाठी धर्मादाय आयुक्त कार्यालयातून निरीक्षक येणार आहे. असे खोटे सांगून समाज्याची दिशाभूल केली. ह्या तथाकथीत निवडणुकीच्या कार्यक्रम हा सामाजिक उपक्रम झालाच नाही.

२. निवडणूक घेण्याअगोदर सर्व सभासदांची यादी अद्ययावत करणे (खाणेसुमारी) गरजेचे असते. परंतु आपण सभासद यादीचे अवलोकन करता असे आढळून आले कि,कोणत्याही सभासदांचे वय नाही, ८९% सभासदीचें पत्ते नाहीत किंवा अर्धवट आहेत. (१८% बांधवांचे अजिबात पत्ते उपलब्ध नाही. ७१% बांधवांचे पत्ते अर्धवट आहेत). जी संख्या सन २००८ चे दरम्यान साधारण ३५००+ होती. तसेच १०-१५ वर्षात लग्न करून पुण्यात आलेल्या अनेक महिलांची नावे यादीत नाहीत. अनेक दिवंगत व लग्न होऊन परगावी गेलेल्या भगिनी असे अनेकांची नावे कमी करण्याचे राहून गेलेले आहे. याबद्दल आम्ही यांनी वेबसाईटवर

पहिली यादी जाहीर केल्या बरोबर ई-मेल पाठवून कळविले होते. त्यानंतर अफरातफर करून अनेकांची नावे दुसऱ्या यादीत घालण्यात आली. यावरून हि यादी अर्धवट बनवलेली आहे असा निष्कर्ष काढता येतो.

३. निवडणूकीला उभे राहिलेल्या समाजातील अनेक इच्छुक उमेदवारांचे अर्ज ह्या अर्धवट सभासद यादीचा आधार घेऊन रद्द करून निवडणूक लढविण्यापासून परावृत्त करण्यात आले. यातून हि निवडणूक समिती पक्षपाती होती, हे स्पष्ट दिसून येते.

४. कोणतीही निवडणूक घेण्याअगोदर बदलअर्ज प्रलंबित असलेल्या सर्व विश्वस्तांचा कार्यकाळ संपलेला पाहिजे अथवा त्यांचा राजीनामा आणि ना हरकत प्रमाणपत्र घेणे गरजेचे असते. अशी कोणतीही प्रक्रिया न राबविता अगोदरचे बदल अर्ज तसेच प्रलंबित ठेऊन तथाकथित निवडणूक पार पडली गेली. ह्यातून अजून एका बदल अर्जाची भर, आणखी काहीही निष्पन्न नाही.

५. ह्या तथाकथित निवडणुकीने प्रलंबीत प्रकरणामध्ये अजून वाढ झाली. मागील बदल अर्ज हे निकालात काढले नाहीत आणि त्यामुळे भविष्यातील कायदेविषयक अडचणी अजून गुंतागुंतीच्या झालेल्या आहेत. फक्त समाज्याच्या पैशाचा व सभासदांच्या वेळेचा अपव्यय.

६. निवडणूक समिती हि समाजातील अनुभवी, पारदर्शी आणि निष्पक्ष कारभार करणारे यांची बनविली जाणे अतिआवश्यक होते. तसेच निवडणूक समितीची निवड सर्व साधारण सभेमध्ये सर्वानुमते करणे गरजेचे असताना, यांनी स्वतः च्या मर्जीने यांची नेमणूक केली हे कोणत्या नियमात बसते ?

निवडणूक समिती मध्ये आमचे कार्यकारिणीवर मा. धर्मादाय आयुक्त याचे कार्यालयात हरकत दावा दाखल करणाऱ्यांना, कार्यकारिणीतील व्यक्तीच्या घरातील व ज्यांना संस्थेच्या कामासाठी या कार्यकारिणीकडून पैसे मिळतात असे व्यक्ती निवडणूक समिती मध्ये स्थान देऊन हि निवडणूक निष्पक्ष नाही हेच सिद्ध झाले. त्यामुळे त्यांचे कडून निष्पक्ष कार्य घडेल याची खात्री देताच येणार नाही.

७. उमेदवार अर्ज फी हि ५०० रुपये आणि डिपॉजीट हे २००० रुपये होते. अशी अवाजवी रक्कम अनेक समाज बांधवांना निवडणुकीपासून वंचित ठेऊन गेली.

८. समाजातील काही समाजबांधवांनी लेखी निवेदन देखील जाहीर केलेले होते. परंतु त्याची दखलही घेतली गेली नाही.

अश्या अनेक कारणांनी ह्या अन्यायाविरोधात आम्ही मा. धर्मादाय कार्यालयात याविषयी आमचे निवेदन निवडणूक आधीच दाखल केलेले आहे. ज्यावर आज (१४/११/२०२४) पर्यंत यांनी मा. धर्मादाय कार्यालयात आम्ही विचारलेल्या प्रश्नांना उत्तर दिलेली नाहीत. पुढील तारीख ०५/१२/२४ रोजी आहे.

## स्वारगेट जागेचा हाता तोंडाशी आलेला घास ?

कादीरभाई प्रकरण : स्वारगेट जागेसंदर्भात हेमाडे व कादिरभाई ताब्यातील जागा ताब्यात घेताना कोणीही अधिकृत ट्रस्टी अधिकृत नसल्याने समाजाचे क्लार्क श्री राजू महादेव पवार यांचे नाव समाजाचे सेक्रेटरी म्हणून पुढे करून त्यांचे नावावर ताबा मागणी करण्यात आली. भाडेकर्यांना याविषयी काही माहिती होण्याअगोदरच हेमाडे जागा ताब्यात घेण्यात आली. परंतु कादिर भाई ताब्यातील जागा ताब्यात घेताना श्री राजू महादेव पवार यांचे सत्य उघडे पडले आणि त्यामुळे आता कादिरभाई ताब्यातील जागा ताब्यात घेणे

अवघड  होऊन बसले आहे. कोर्टात तात्पुरत्या फायद्याचे बघून वाट्टेल ते बेकायदेशीर लिहून दिल्याने, केवळ तात्पुरता फायदा कदाचित होईल. परंतु दूरगामी नुकसान होते, असे करणे आवश्यक आहे का ? याचा समाजबांधवांनी विचार करणे आवश्यक आहे.

समाजातील काही लोकांना त्रास द्यायचा आणि जागेसंदर्भात कोर्टात काहीही बेकायदेशीर लिहून द्यायचं.  त्यामुळे ज्यांना त्रास सहन करावा लागलेला आहे त्यांनी कोर्टात दाद मागितली कि मग... समाजाचं नुकसान होते आहे, अश्या बोंबा अनेकांनी ऐकल्याचं असतील.

एकीकडे कोर्टात न टिकणारे मुद्दे दाखल करायचे आणि दुसरीकडे समाज बांधवांवर अन्याय करायचा. त्यामुळे अनेक कोर्ट केसेस मध्ये अडथळे येतच राहणार.....समाजाला ह्या चक्रव्यूहातून काढण्याची मानसिकता तर दिसून येतच नाही, उलटपक्षीत समाजाला ह्या चक्रव्यूहात ठेवण्यातच समाधान आहे, असे जाणवते. कादिरभाई प्रकरणात आजताब्यत २ वेळा ताब्याची ऑर्डर झाली. तरीही ताबा घेता आला नाही. यासारखे दुर्दैव नाही. आता या प्रकरणावर जागेचा ताबा घेण्यास पुन्हा कोर्टाची स्थगिती आली आहे.

### गोकुळ भवन व इतर भाडेकरी प्रकरण :

सर्वांना माहितीच असेल कि दिनांक ११ जुलै २०१९ रोजी समाजाला सदर इमारत धोक्याची झालेली आहे.यासाठी यांनी समिती केली. पण  यासमितीने याबाबत काय केले समाजाला काही सांगितले नाही. त्यानंतर ११ जुलै २०२४ रोजी तशीच नोटीस पुन्हा आली. संपूर्ण इमारत पाडून टाकण्याच्याबद्दल दिनांक १० ऑगस्ट २०२४ रोजी स्वारगेट येथिल जागेत याबद्दल सर्वांगीण बैठक आयोजित करण्यात आली. ह्या बैठकीत सर्वांनी एकत्रित कार्य करण्याचे ठरविले. परंतु पुन्हा ह्या बाबतीत विविध कोर्ट केस मध्ये आणि विविध कार्यालयात जरुरीचे पेपर्स दाखल करतांना कोणालाही काहीही कळविण्यात आले नाही. यांनी मांडलेले म्हणणे कोर्टाने फेटाळून लावले आहे आणि आता ह्या केस वर देखील स्थगिती आलेला आहे.

### युको बँक व संदर्भांकित फौजदारी गुन्हा क्रमांक ४२७/२०२३ :

श्री विनेश झाड कार्यकारिणीतील काही सदस्य, माजी कार्यकारिणीतील अध्यक्ष व युको बँकेतील काही सन्माननीय कर्मचाऱ्यांवर श्री मनोज आरसीध्द यांचेकडून गुन्हा दाखल झालेलं सर्वांना माहिती पडलेच असेल. त्यातील काही बाबी अनेकांना माहिती नसतील त्या इथे स्पष्ट करीत आहोत.

हा आरोप ६० हजार रुपये श्री स्वामी वकिलांनां खर्च केले यासाठी दाखल केला आहे. खरी रक्कम हि केवळ १६ हजार रूपये आहे. कारण बाकीचं रक्कम आपण श्री स्वामी यांच्या  बँकेच्या चेकने ट्रस्टच्या खात्यात परत घेतली आहे. हे आपण आपल्या मागील आर्थिक वर्ष  २०२२-२३  हिशेबात देखील दाखविलेले आहे आणि ११ जून २०२३ रोजी झालेल्या सर्व साधारण सभेत पूर्ण सांगितले आहे. परंतु पोलिसांपासून हे तथ्य लपविण्यात आले. कादिर भाई ताब्यातील स्वारगेट येथील जागा समाजाला परत मिळविण्यासाठी व इतर काही न्यायालयीन  प्रकरणे यावर काम करण्यासाठी आपण श्री स्वामी  वकील यांना कार्यकारणीचे रीतसर ठराव करून नेमले होते त्यांना. आपण ऍडव्हान्स पेमेंट केले होते.

हा गुन्हा दाखल करताना आजतागायत आमची पोलिसांकडून चौकशी झालेली नाही. याचाच अर्थ हा गुन्हा एकतर्फी झालेला असून पोलिसांपासून काही धक्कादायक बाबी लपवून हा गुन्हा दाखल केला गेला आहे. हे उच्च न्यायालयाच्या अंतरिम निकालावरून स्पष्ट होते. व त्यामुळे पोलिसांना आमच्यावर आरोपपत्र दाखल करण्याची मनाई करण्यात आलेली आहे.

- जामीन आदेशातही, हा गुन्हा अनेक महत्वाची तथ्ये पोलिसांपासून लपवून ठेवून करण्यात आलेले आहे व दिवाणी प्रकारच्या दाव्याला गुन्हेगारी स्वरूप देण्यात आलेले आहे, असे स्पष्ट नमूद करून आदेश करण्यात आलेला आहे.
- सर्व समाज बांधवांना आणि काही युवकांना मध्ये असा संभ्रम पसरविण्यात आलेला आहे कि, बँकेत खोट्या सह्या केल्या. श्री विनेश झाड कार्यकारिणीकडून असा खुलासा करण्यात येत आहे कि, अश्या कोणत्याही खोट्या सह्या करण्यात आलेल्या नाही. आम्ही आमच्याच खोट्या सह्या केल्या असे यांचे म्हणणे आहे का **?**
- खरी हकीकत अशी आहे कि, युको बँकेत आमच्याच सह्या अधिकृत आहेत व श्री मनोज आरसीध्द कार्यकारणीचा युको बँकेतील ट्रस्टच्या अकाउंटशी काहीही संबंध नाही. सर्वप्रथम माजी अध्यक्ष श्री अनिल वाळवेकर यांना रीतसर विनंती पत्र देण्यात आले. त्यांना पत्र देण्याचे कारण असे होते कि, सदर खाते २००८ पासून २०२२ पर्यंत (१४ वर्ष) त्यांचे कार्यकारिणीच्या ताब्यात होते. त्यामुळे त्यांचे परवानगीनेच हे खाते श्री विनेश झाड कार्यकारणीकडे ट्रान्सफर करण्यात आले. त्यानंतर श्री विनेश झाड कार्यकारिणीने यातून काही रक्कम समाजाच्या न्यायिक कामासाठी कार्यकारणीचे ठराव करून ऑनलाईन खर्च केलेली आहे. हे मागील वर्षी दिलेल्या हिशोबात नमूद केलेले आहे. हिशोब जाहीर करून त्याची सर्व साधारण सभेत मंजूर सुद्धा घेतलेली आहे. परंतु ह्या सर्व बाबी पोलिसांपासून लपविण्यात आलेल्या आहेत.
- काही समाज बांधव ह्या विषयाचा पूर्ण अभ्यास न करता, तोंडी मिळालेल्या अर्धवट माहितीच्या आधारे, चुकून किंवा अनावधानाने व्हाट्सअप वर "खोट्या सह्या केल्या" वगैरे असे मेसेजेस करीत आहेत. त्यांनी कृपया खोटी माहिती पसरवून नये अन्यथा कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात येत आहे.
- काही समाज बांधवांनी काही ग्रुप्स वर चुकीचे मेसेसजेस पसरविले आहेत. त्याबद्दल कार्यकारणी कोणत्याही दबावाखाली नाही. तसेच अश्या प्रकारच्या दबावाला प्रतिउत्तर देण्याच्या तयारीत आहे.

**मध्यस्थांचे प्रयत्न :**

गेल्या २/३ वर्षात समाजातील अनेक लोकांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रत्येक भेटीत असे प्रकर्षाने जाणवून आले कि समोर बसल्यावर कोणत्याही विशिष्ट मुद्द्यावर, ऑन-पेपर, किंवा तथ्यांवर आधारीत चर्चा न होता केवळ अवांतर चर्चा होते. मागचे ज्याचा आमच्याशी काहीही संबंध नाही, असे सगळे विषय एकाच वेळी चर्चेला घेतल्याने काहीच निष्पन्न झाले नाही. मिटिंगचे कोणतेही रेकॉर्ड ठेवले गेले नाही. रेकॉर्ड ठेवायचे विचारल्यास "हि केवळ अनौपचारिक चर्चा आहे". केवळ ह्या बोलीवर अनेक

अर्धवट आणि निरर्थक चर्चा होऊन गेल्या आहेत. त्यातून काहीही निष्पन्न नाही. प्रत्येक चर्चेत केवळ 'तुमचा बदल अर्ज मागे घ्या, A-१६ वापरू नका' हा एक आणि एकाच मुद्यावर चर्चा करण्यास जोर दिला जातोय, असे जाणवून आले. नंतर नंतर फौजदारी गुन्ह्यात अडकवून, समोरासमोर चर्चेत ट्रस्ट कार्यकारिणीला मा. धर्मादाय कार्यालयातून बदल अर्ज मागे घेण्यास प्रेशर करणे, हा एक अजेंडा प्रकर्षाने दिसून आला.

त्यामुळे आज ट्रस्ट कार्यकारणीचे सर्व १५ विश्वस्त व त्यांना समर्थन देणारे समाजबांधव यांचेकडून स्पष्ट करण्यात येत आहे कि, ट्रस्ट कार्यकारणी कोणत्याही परिस्थतीत 'बदल अर्ज' मागे घेण्यात येणार नाही. याउपर फौजदारी गुन्ह्याची धमकी देऊन तर अजिबात नाही.

**कोणत्याही फौजदारी गुन्ह्याच्या धमकीला कार्यकारणी भीक घालत नाही.**

===========================================================

**परंतु, सर्व समाज हितचिंतक मिळून केवळ संस्थेच्या व समाजाच्या हितासाठी पारदर्शक व निष्पक्ष निर्णय घेण्यास आमची कार्यकारणी नेहमी तयार आहे.**

===========================================================

संस्था आणि समाज यातील गल्लत :

आज आपण जे काही सर्व बांधव भगिनी आहोत त्यांच्या आचार विचारांचा एक समूह आहे तो एक समाज आहे. ह्या समाजच्या भल्यासाठी, उन्नतीसाठी काही जण पुढाकार घेऊन काही कार्य करू इच्छितात ती असे संस्था. संस्थेने समाजच्या कल्याणासाठी झटणे अपेक्षित आहे. काही ठराविक कार्यालय किंवा जागा म्हणजे समाज नाही. हा समाजाचा एक भाग आहे आणि त्याचा फक्त समाजाच्या उन्नतीसाठी वापर व्हायला हवा.

ट्रस्ट कार्यकारणीचे कायदेशीर मार्गानेच प्रवेश :

कार्यकारिणीने राजमार्गानेच व घटनात्मक तरतुदीने प्रवेश केलेला असून समाजाने संमत केलेल्या २८ / २०१५ ह्या घटनेचे पूर्ण पालन करूनच बदलअर्ज दाखल केलेला आहे. मा. धर्मादाय कार्यालयात न्याय मागायचे सोडून केवळ दबाव आणण्यासाठी फौजदारी गुन्हे दाखल झाले असल्याचे शासकीय कार्यालयाला देखील आज याची जाण आली आहे. आम्हीच आमचा प्रवास एका खडतर मार्गावरून सुरु केला आहे. आमचे तप सुरु आहे, आणि सुरूच ठेवणार. तप भंग करणारे जीव ओतून प्रयत्न करणार हे माहीतच आहे, अनेक अडथळे येणार हे गृहीत धरलेलेच आहे, यात काही नवल नाही..... परंतु हे सर्व पचवून आम्ही समाजाला एक नवीन दिशा देण्याचे कार्य चालू ठेवणार आहोत.

समाजाने टाकलेल्या विश्वासाला जागून आम्ही समाजसेवेचा ५ वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करणारच. तसेच समाजाने पुन्हा विश्वास दाखविल्यास २०२७-२०३२ चा पुढील ५ वर्षाचा कार्यकाळ देखील ह्याच हिमतीने समाज सेवेत व्यतीत करण्याची शक्ती व युक्ती अनेक संस्था हितचिंतक समाजबांधव देत आहेत.

## श्री. सो. स. क्षत्रिय समाज ट्रस्ट पुणे. A १६ कार्यकारणी

## उपसंस्था मनोगत

शिक्षण हे समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध गोष्टींचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणाने विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची उंची गाठण्यासाठी मोठा हातभार लागत असतो. या ज्ञानाच्या जोरावरच विद्यार्थी आपली उद्दिष्टे काढण्याचा प्रयत्न करतात. आज शिक्षणाचा नुसता बाजार मांडला गेलेला आहे असे दिसते. शिक्षणाचे माहेरघर असणाऱ्या पुण्यनगरीत सुद्धा शिक्षण घेणे हे गरिबांसाठी आता राहिलेले नाही.

आपण बघतो की दहावी व बारावीनंतर शिक्षण घेण्यासाठी खूप जास्त पैसा खर्च करावा लागतो. सध्याच्या काळात हा खर्च सर्वसामान्य व्यक्तीला परवडत नसल्याने अशा शिक्षणापासून अनेक विद्यार्थी वंचित राहिलेले आपणास दिसून येतात. अशा विद्यार्थ्यांसाठी समाजात शिष्यवृत्ती योजनेची अत्यंत महत्वाची गरज आहे. त्यामुळे अशा गरीब विद्यार्थ्यांना त्याचा योग्य प्रकारे त्यांना फायदा होऊन शिक्षण पूर्ण करण्याची संधी प्राप्त होईल व यातूनच विद्यार्थ्यांची जडणघडण चांगल्या पद्धतीने होऊन एक चांगला नागरिक निर्माण होण्यास यांनी मदत होऊ शकते.

आजच्या शिक्षण क्षेत्रामध्ये मुलींपेक्षा मुलांची शिक्षणाकडे ओढ ही कमी होत आहे, असे मोठ्या प्रमाणात दिसून येते. पूर्वी विद्यार्थ्यांचे पाढे कविता सुविचार म्हणी या पाठ असायच्या, परंतु आजचा विद्यार्थी या सर्व गोष्टींपासून दूर जात आहे, हे प्रकर्षाने जाणवते. विद्यार्थी हा ज्ञान केंद्रित असला पाहिजे त्याला अभ्यासाचे व्यसन लावले पाहिजे. विविध माध्यमातून नवनिर्मिती करणारा असला पाहिजे. आज विद्यार्थी हा सेल्फ स्टार्टर असला पाहिजे, तो सांगकाम्या नसावा, तो दुसऱ्याला ऊर्जा देणारा असावा व असे विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षक मंडळातर्फे नवनवीन उपक्रम राबवण्याचा विचार आहे. धन्यवाद.

श्री सो स क्षत्रिय शिक्षण मंडळ पुणे
अध्यक्ष : श्री गणेश दगडू

2022 मध्ये युवती संघटनेचे सूत्रे हातात घेतल्यानंतर महिला उद्योजक व महिला सबलीकरण यावर काम करताना अत्यंत समाधान वाटले. पुढे प्रांतिक कार्यकारणीवर निवड होऊन येवला येथील युवक शिबिर व पुणे येथे वधू-वर मेळावा हे उपक्रम देखील सुनियोजित पद्धतीने पार पाडले गेले. अशाच पद्धतीने पुढील उपक्रम राबवून समाज उपयोगी सेवा कायम सुरु ठेवण्याचा निर्धार आहे. सर्व महिलांनी, युवतींनी महिलांसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, धन्यवाद.

सौ शीतल काटवे
अध्यक्ष : युवती संघटना, पुणे
सदस्य : महाराष्ट्र प्रांतीय

# भावपूर्ण श्रद्धांजली

कै.श्रीमती कमला भिकुसा पवार ११/०४/२३
कै.श्रीमती कांताबाई बाबुलालसा क्षत्रिय १६/०४/२३
कै.श्री. मोहनसा रामचंद्रसा पवार १६/०४/२३
कै.श्री. सुभाषसा विठ्ठलसा त्रिमल १७/०४/२३
कै.श्री. हनुमंतसा विठ्ठलसा बाकळे २१/०४/२३
कै.सौ. गायत्री दिनेश निरंजन १७/०५/२३
कै.श्री. सुधीरसा लक्ष्मणसा काटवे ०५/०७/२३
कै.श्री. प्रदीपसा दिगंबरसा खोडे १५/०८/२३
कै.श्री. किरणसा पांडुरंगसा दलभंजन १६/०८/२३
कै.श्री. उमेश (बाबुरावसा ) भिकुसा पवार २३/०८/२३
कै.श्री. मोतिलालसा नारायणसा चव्हाण ०२/०९/२३
कै.सौ. हिता गिरीशसा पडोळ २६/०९/२३
कै.श्री. डॉ सूर्यकांतसा प्रभाकरसा चावंडे ३०/०९/२३
कै.सौ. मालती खानापुरे ०३/१०/२३
कै.श्रीमती प्रभावती कृष्णासा हबीब २८/१०/२३
कै.कु. सरोजिनी दत्तात्रयसा कबाडे ०१/११/२३
कै.श्री. रामकिशनसा बजरंगसा गऊल ०५/११/२३
कै.श्री भागचंद्रसा माणिकलालसा क्षत्रिय १०/११/२३
कै.सौ. ज्योती अर्जुनसा काटवे ११/११/२३
कै.श्रीमती इंदुमती रामचंद्रसा चव्हाण ०४/१२/२३
कै.श्री. सुधाकरसा दिगंबरसा भूमकर १२/१२/२३
कै.श्री. स्वप्निलसा सुनीलसा चौधरी १९/१२/२३
कै. श्री. वत्सलाबाई अंबादाससा गुजराथी ३०/१२/२३
कै.सौ. सुमन लक्ष्मणसा खेरुड ०६/०१/२४
कै.श्रीमती सुनंदा मोहनसा मलजी ३०/०१/२४
कै.श्री. गोपाळसा तुकारामसा मिस्कीन ३१/०१/२४
कै.श्री. विश्वनाथसा सिद्रामसा भांडगे ०६/०२/२४
कै.श्री. नारायणसा व्यंकटसा पेंदु ०७/०२/२४
कै.श्री. विश्वाससा बाळकृष्णसा धोंगडी १७/०२/२४
कै.श्रीमती प्रतिभा श्रीधर बोजगिरी २४/०२/२४
कै.श्रीमती शशिकला रामभाऊसा दगडू १६/०३/२४
कै.श्री. हनुमंतसा शंकरसा धोंडाळे १५/०४/२४
कै. श्री. तुकारामसा भीमरावसा मेंगजी. २७/०४/२४
कै. कु. राजेश्री चंद्रकांत बिद्री ०२/०५/२४
कै.सौ. लक्ष्मीबाई बाळासाहेब कटारे ३१/०५/२४
कै.श्री. जवाहर लक्ष्मणसा धोंगडी ०६/०६/२४
कै.श्री. रामदाससा गोपीनाथसा दलभंजन ०८/०६/२४
कै.श्री. सुनीलसा पांडुरंगसा चव्हाण १७/०६/२४



ज्या ज्ञात-अज्ञात समाज बंधू-भगिनींचे गत वर्षी निधन झाले त्या
बंधू-भगिनींना पुणे समाज व कार्यकारिणी कडून
भावपूर्ण श्रद्धांजली

# ११ जून २०२३ - वार्षिक सर्व साधारण सभा








# १८ फेब्रु २०२४ - समाजातील मुलं-मुलींसाठी अखिल भारतीय वधुवर मेळावा












# १८ फेब्रु २०२४ - समाजातील मुला-मुलींसाठी अखिल भारतीय वधुवर मेळावा













# १० मार्च २०२४ - युवती संघटना - महिला दिन






















१२ जुन २०२३ - स्वारगेट मंदिर परिसरात वारकरी  महाप्रसाद







## युवा शिबिराचे शिवधनुष्य पेलणारे महारथी

युवा शिबिराचे आयोजन करणे हे एक आव्हानात्मक कार्य आहे. त्यासाठी संपूर्ण नियोजन, व्यवस्थापन आणि निधीची आवश्यकता असते. प्रांतिक यांनी हे सर्व कार्य अत्यंत कुशलतेने आणि निष्ठेने पार पाडले. त्यांच्यामुळे शिबिर यशस्वी झाले आणि त्यात सहभागी झालेल्या सर्व शिबिरार्थींना त्याचा मोठा फायदा झाला. प्रांतिक ने संपूर्ण नियोजन एखाद्या अनुभवी खेळाडू प्रमाणे पूर्ण केले.

शिबिराचे यश खालील बाबींवर अवलंबून असते:

- वेळेचे काटेकोर नियोजन
- सर्व वक्त्यांची ये-जा आणि राहण्याची व्यवस्था
- सर्वांची राहण्याची आणि भोजन व्यवस्था
- प्रशस्त हॉल
- पुरेसा निधी
- धार्मिक अधिष्ठान लाभलेली पवित्र जागा

प्रांतिक यांनी या सर्व बाबींवर बारकाईने लक्ष दिले आणि शिबिरासाठी सर्व आवश्यक व्यवस्था केल्या. त्यांनी वक्त्यांना बोलावण्यासाठी आणि त्यांच्या व्यवस्थांसाठी देखील पुरेसे निधी उभे केले. शिबिरासाठी त्यांनी एक धार्मिक अधिष्ठान लाभलेली पवित्र जागा निवडली, ज्यामुळे शिबिराला एक आध्यात्मिक पवित्रता मिळाली.

शिबिरार्थींनी शिबिराबद्दल भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत. त्यांनी शिबिरातून खूप काही शिकायला मिळाले असल्याचे सांगितले आहे. शिबिराने त्यांच्यातील नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी आणि कर्तृत्व वाढवण्यास मदत केली आहे. त्यांनी आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याचा निश्चय केला आहे. लवकरच सर्व प्रतिक्रिया देखील प्रसारित करून समाजाचा एक आरसा आपल्या समोर येणार आहे. त्यातून संपूर्ण समाजाला केवळ शिकण्यासारखेच नाही तर अनुकरण करण्यासारखे देखील खूप काही आहे.

शिबिरातून समाजातील सर्वांनाच काहीतरी घेणसारखे होते. शिबिरात अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. या विषयांमध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक विषयांचा समावेश होता. या विषयांवर चर्चा केल्याने शिबिरार्थींना समाजातील अनेक समस्या आणि त्यांचे निराकरण कसे करावे याबद्दल जाणून घेता आले. असे समजा शिबीर हे सागराचे उदर होते आणि जिथे अगणित मोती विखुरलेले आहेत, अश्या उदरात ३ दिवस जितके जमेल तितके मोती लुटायचे.

हव्यास केला ज्ञानाचा, कास धरली सेवेची, समाजसेवेस अर्पण झाले, प्रांतिकचे कार्य ऐसेची !
सेवेसाठी त्यांची तळमळ, दिवस अन रात्र, त्या सेवाभावाने उजळले, प्रांतिकचे चरित्र !
प्रांतिक हे खरे समाजसेवक, प्रेरणादायी हमखास, युवा युवतींना दिली, एक नवीन आशा अन विश्वास !
त्यांनी दाखवून दिला, ज्ञान आणि सेवाभाव, हीच अमोघ शस्त्रे, इतकेच प्रांतिकला ठाव !
प्रांतिक कडून अजून भविष्यात अधिकाधिक कार्य घडो यासाठी शुभेच्छा !

श्री. सो. स. क्षत्रिय समाज, ट्रस्ट, पुणे -A16

# काल उदरात गडप झालेले काही मोती : श्री मोरो विठ्ठल वाळवेकर

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात अशा अनेक व्यक्ती आहेत की, ज्यांनी मोलाची कामगिरी बजावली, परंतु ते सर्व अनामिकच राहीले. आपलयाला सर्वांना महात्मा ज्योतिबा फुले हे माहितीच असतील. श्री मोरो विठ्ठल वाळवेकर हे त्यांचे मित्र, सहकारी व स्नेही होते. त्या काळी पुण्यात कॉलेज किंवा कोणत्याही प्रकारची शैक्षणिक अकॅडमी नव्हती. वाळवेकर हे एका गरीब कुटुंबातून असल्याने त्यांचे शिक्षण एका मिशनरी शाळेतून झाले. महात्मा फुलेंच्या चरित्र पुस्तकांमधून त्यांची माहिती मिळते. फुलेंना इंग्रजी ग्रंथ समजून घेण्यासाठी वाळवेकरांनी खूप मदत केली. यामुळे फुलेंना एक नवीन वैचारिक खजिनाच मिळाला.

8 एप्रिल 1870 रोजी उदारमतवादी मंडळींनी सार्वजनिक सभा स्थापन केली. गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका आणि सदाशिव गोवंडे हे या सभेचे मुख्य होते. जनतेची वृत्तपत्रातून गाऱ्हाणी जाहीर करणे व सरकारकडे मांडणे हा उद्देश होता. मोरो विठ्ठल वाळवेकर आणि सखाराम यशवंत परांजपे हे या निमित्ताने मुंबईस जाऊन राहिले. लोकांची गाऱ्हाणी व दुःखे सरकारपुढे मांडून ती सरकारकडून निवारण्यासाठी सार्वजनिक सभेच्या वतीने ही मंडळी प्रयत्न करीत. लॉर्ड लिटन याने वृत्तपत्रांची गळचेपी करण्यास काढलेल्या निबंधाविरुद्ध भारतीय वृत्तपत्रांची मोठी संघटना या मंडळीने निर्माण केली. त्याबरोबर परदेशी वस्तूऐवजी स्वदेशी वस्तू वापराव्यात, अशा प्रचारास प्रारंभ केला

वाळवेकरांनी सर्व धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करून सार काढले, की प्रत्येक धर्मात अशी काही तत्वे आहेत, की ती केवळ श्रद्धेनेच मानावयाची असतात . म्हणून "सर्व धर्मात जी काही समान तत्त्वे आहेत, त्याचेच अनुकरण करावे". या विचाराने त्यांचे मित्र प्रभावित झाले होते. त्यांच्या विचारांचा मुख्य सिद्धान्त असा की परोपकार हे पुण्य व परपीडा हे पाप होय. त्यांनी मित्रांना पटवून दिली कि लोकसेवेचा आदर्श आणि सार्वत्रिक शिक्षणप्रसार करण्यासाठी परिश्रम करणे, यावर भर दिला पाहिजे, तो त्यांच्या मित्रांना पटला.

वाळवेकर यांनी लिहिलेल्या कोल्हापूरच्या महाराणी छत्रपती ताराराणी यांचे चरित्र सावित्रीबाई यांच्या अध्यक्षतेखाली प्रकाशित झाले होते. प्रार्थना मंदिरासाठी १८७३-७४ दरम्यान त्यांनी ७० रुपये वर्गणी दिलेले उल्लेख आहेत. सुवोध पत्रिका हें समाजाचें वर्तमानपत्र नुकसानानेच चालले असायचे, परंतु मोठे मन असलेले मोरोपंत वाळवेकर यांनीं तें नुकसान बरेच वर्षे सोसले.

१८७२ साली 'निलदर्पण' नावाचे एक नाटक वाळवेकरांनी मूळ बंगाली भाषेतून मराठी मध्ये केले होते. बंगाळमधीळ असहाय व गरीब शेतकऱ्यांना नीळ पिकविणाऱ्या युरोपीयन लोकांच्या जुलमापासून मुक्त करण्यासाठीं हें नाटक लिहिले गेले "या नाटकांत लोकस्थिति, जुलूमाचा प्रकार, कांही कांहीं युरोपियन अधिकाऱ्यांचे एतद्देशीय प्रजेच्या हिताविषयीं दुलंक्ष आणि नीळ पिकविण्याच्या जुलमाच्या प्रकारांन एका सुखी शेतकरी ग्रहस्थाच्या कुटुंबाचा नाश व दुःखकारक परिणाम. इत्यादि गोष्टी उत्तम रीतीनें व मनावर ठसा उमटण्यासारख्या प्रकाराने दाखविल्या आहेत. अश्या तऱ्हेचे उपयुक्त ग्रंथ लिहिण्याची महाराष्ट्रांतील लेखकांनाही इच्छा व्हावी म्हणून वाळवेकर ह्यांनीं हें भाषांतर केलें. ते आपल्या प्रस्तावनेत म्हणतात, "ग्रंथाचे भाषांतर सादर करण्यांत माझा सुख्य उद्देश लोकांमध्यें हल्ली जीं नाटके, कादंबऱ्या वगेरे ग्रंथ करण्याची इच्छा उत्पन झाली आहे, तिचा कल उपयुक्त व आपल्या लोकांस दुःखमुक्त करण्याकडे वळावा आणि हल्ली जीं अनेक प्रकारचीं दुःखे, लोकाचार, व्यापार व राज्यरीति यासंबंधाने होतात तीं निवारण करण्यास साह्यभूत होतील अशा प्रकारचे

नाटक वगैरे ग्रंथ आपल्या महाराष्ट्र भाषेत व्हावे असा आहे". या नाटकातील विषय गोऱ्या इंग्रजी अधिकाऱ्यांना तर राहोच, खुद्द इंग्रज सरकारलाही झोम्बला. इंग्रजी अनुवादकर्ते मायकेल मधुसूदन दत्त हे ख्रिस्ती असूनही त्यांची नोकरी गेली तर रेव्हरंड जेम्स लॉर्ड या इंग्रजी मिशनऱ्याला या नाटकाचे प्रकाशन केल्याबद्दल कारावास भोगावा लागला. (हा पादरी लॉर्ड हसत हसत जेल मध्ये गेला आणि जाताना हे म्हणाला कि, मी जे काही केले आहे ते बाहेर आलो कि पुन्हा हेच करणार, धन्य त्या लॉर्ड पादरीची). "काही साहेब लोक बंगल्यातील रयतेवर जूलूम करितात ही गोष्ट ६०० कोस दूरच्या लोकानी नाटकाद्वारे प्रसिद्ध केली" अशी प्रसिद्धी नाटकाला मिळाली.

गोविंद गणपत काळे, महादू सहादू वाघोले, ग्यानोबा कृष्णाजी ससाणे आदींनी वृद्धावस्थेत नोंदविलेल्या आठवणींमध्ये प्रसंगानुसार सावित्रीबाई या मोरो विठ्ठल वाळवेकर संपादित गृहिणी मासिकात लेखन करीत असल्याच्या नोंदी केल्या आहेत. या संदर्भात गोविंद काळे म्हणतात की , "स्त्रियांविषयी एक स्वतंत्र मासिक काढण्याबद्दल सावित्रीबाईंनी सुचविल्यावरून वाळवेकरांनी गृहिणी या नावाचे एक मासिक काढले होते. या मासिकात 'स्त्री शिक्षण व त्यांचा सामाजिक समान दर्जा' यावर लेख येत असत . या मासिकाच्या अंकाची सावित्रीबाई दर महिन्याला वाट पाहत असत व ते आलं म्हणजे त्या मोठ्या आवडीने वाचत. त्यात देण्यासाठी सावित्रीबाई लहान मोठे लेख लिहीत असत, परंतु आपले स्वत: चे नाव प्रसिद्ध करणे सावित्रीबाईंना मुळीच आवडत नसे. त्यामुळे टोपणनावाने अथवा दुसऱ्या एखाद्या मैत्रिणीच्या नावाने त्या लेख प्रसिद्ध करीत असत. ग्यानोबा ससाणे लिहितात की, वाळवेकर यांनी सावित्रीबाईंच्या आग्रहावरून गृहिणी नावाचे मासिक काढले होते. हीच नोंद महादू सहादू वाघोले यांनी पुढीलप्रमाणे केली आहे. ते म्हणतात की, सावित्रीबाईला स्त्री जातीच्या उन्नतीची फार कळकळ असे. तिच्या आग्रहावरून मोरो विठ्ठल वाळवेकर यांनी गृहिणी मासिक काढले होते.

फुलेंच्या अंतिम क्षणात :

जोतीरावांचा आजार अधिक विकोपास गेला. त्यांना समजून चुकले , की इहलोकीची यात्रा संपत आली आहे. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांना त्यांनी बोलावून घेतले . शांतपणे उपदेश केला . अनेकांना हुंदके आले. त्यांनी दुःख आवरा म्हणून कळकळीने आदेश दिला. "सावित्रीबाई आणि यशवंत यांना सांभाळा. हे माझे कार्य पुढे चालू ठेवतील", असे ते म्हणाले. लोखंडे समाचारास वारंवार येऊ लागले. भालेकर आले आणि त्यांनी प्रणाम केला. ससाणे, डॉ. लाड, रामय्या व्यंकय्या अय्यावारू आणि मोरो विठ्ठल वाळवेकर त्यांची भेट घेण्यासाठी आले. त्यावेळी फुलेंनी 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तक लिहून ठेवले होते, परंतु छापण्याचा खर्च हा प्रश्न सुटला नव्हता. वाळवेकरांनी 'ते पुस्तक आम्ही छापू' असे आश्वासन दिले. जोतीरावांच्या मनावरचे एक ओझे कमी झाले. त्यांचे मुखावर प्रसन्न भाव उमटले. 28 नोव्हेंबर 1890 रोजी रात्री दोन वाजून वीस मिनिटांनी फुलेंनी इहलोकाची यात्रा संपविली

जोतिरावांनी एका कवितेत वाळवेकरांची स्तुती केली आहे.

"Moro Vithal is a noble man, tolerant endlessly, stayed in Bombay, was the giver of thought of Subodha, lather of the household, friend of Jotirao"

मोरो विठ्ठल वाळवेकर हे फक्त जोतिराव फुलेंचे मित्रच नव्हते, तर ते एक समाजसुधारक, लेखक आणि पत्रकारही होते. त्यांच्या योगदानामुळे समाजात एक चळवळ निर्माण झाली.

सन **1896** साली वाळवेकरांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले.

## कोर्ट ऑर्डर्स बद्दल काही माहिती
## कादिर भाई जागेचा ताबा प्रकरण

ऑर्डर क्रमांक : ०१

**O R D E R**

Issue possession warrant in the name of the decree holder trust and the possession be delivered to its Secretary namely Raju Mahadeo Pawar.

Date: 23 /03/2021.

(Sagar N. Patil )
Addl. Judge, Small Causes Court,
Pune.

दिनांक २३ मार्च २०२१ रोजी श्री राजू पवार यांना ट्रस्टचे खोटे सेक्रेटरी दाखवून ताब्याची मिळवलेली ऑर्डर.
परंतु ताबा घेण्यात अपयश.

---

ऑर्डर क्रमांक : ३५

**Darkhast No. 196/2006.**
**CNR NO.MHPU03-000970-2006**

**ORDER BELOW EXH. 1**

Perused record of the case. The objection petition Exh.233 has been decided the court on merits and rejected the same. Thereafter another objection petition Exh.331 has been dismissed in default for want of prosecution. There is no stay from the competent court for issuing possession warrant of the suit property. No objection petition survives for consideration of the court. Hence issue possession warrant of the suit premises along with police aid on depositing necessary bhatta to the police station directly without intervention of the court.

Sd/-

**Date: 25/01/2024**

**( L. G. Pachchhe )**
**Addl. Judge, Small Causes Court and**
**Civil Judge, S. D. Pune**

दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी पुन्हा एकदा ताब्याची ऑर्डर झाली. दुर्दैवाने ताबा घेण्यात पुन्हा अपयश

## ऑर्डर क्रमांक ४१ : (ऑर्डरचा काही भाग)

of appeal cannot be considered. But it is to be noted that if the J.D. intends to file appeal against the order passed below exh.339, in that circumstance the order passed below Exh.339 is stayed for 15 days from today. It is the duty of J.D. during this 15 days to obtain certified copy, to prefer appeal and obtained stay order from the appellate court. If he fails to do so no further extension of time will be granted by this court for the above said purpose. Thus the application filed by J.D. for stay of order pass below Exh.339 is partly allowed and the order passed below Exh.339 is stayed for 15 days from today.

Sd/-

**Date: 02/03/2024**

**( L. G. Pachchhe )**
**Addl. Judge, Small Causes Court and**
**Jt. Civil Judge, S. D. Pune**

दिनांक २ मार्च २०२४ रोजी ताब्याच्या ऑर्डर वर १५ दिवसांचा स्टे मिळाला.

---

## Regular Civil Appeal 49 / 2024 मधील ऑर्डर.

**ऑर्डर क्रमांक : ०१, → १८ मार्च २०२४ रोजी ३ महिन्यांचा स्टे मिळाला. स्टे आजतागायत सुरु आहे.**

**ORDER**

1] The application is allowed.

2] The stay is granted for three (3) months from the date of order.

3] Both the parties are directed to maintain status-quo and no extension in any way and nature.

4] Both the parties are directed to submit their final argument on or before three (3) months.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ABDULSATTAR IBRAHIM PARAMPALLI
Date: 2024.03.20 15:09:41 +0530

Pune.
Date : 18.03.2024.

( A. I. Perampalli )
District Judge – 17, Pune.

**अजून अनेक अपील्स प्रलंबित आहेत. नवीन थर्ड पार्टी कोर्ट केस मध्ये प्रवेश करण्याची वाट पाहत आहेत. त्यामुळे कादिर भाई ताब्यातील जागा ताब्यात घेण्यासाठी अजून किती दिवस / महिने / वर्ष लागतील ते माहिती नाही.**

गोकुळ भवन व इतर भाडेकरी प्रकरण

ऑर्डर क्रमांक १४ :

**ORDER**

1] The application stands allowed with costs.

2] Defendant trust is hereby restrained from causing any act or any kind of threatening or endangering or damaging or destructing to the suit premises in the possession and tenancy occupancy of the plaintiffs till the disposal of present suit.

Digitally signed by CHAVAN KETKI MADAN
Date: 2024.10.04 10:44:10 +0530

Pune.
Date – 03.10.2024.

(Ketaki M. Chavan)
2nd Addl. Judge, Small Causes Court,
Pune.

दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केस संपेपर्यंत स्टे मिळाला.

आता इथे कोणी सांगू शकेल कि हि केस किती दिवस / महिने / वर्ष सुरु राहील आणि त्याचबरोबर स्टे किती काळ सुरु राहणार आहे.

तथाकथित गाजलेला (नव्हे.. मुद्दाम गाजवलेला) मनाई हुकूम आदेश, प्रकरण ६४ / २०२२

**ORDER**

1. Application 64/22 is partly allowed.
2. The respondent No. 1 to 15 are hereby temporarily restrained from alienating the trust property and withdrawing the trust funds without permission of Ld. ACC (to whom the trust PTR is allotted) except statutory payments.
3. No order as to cost.

**(S. M. Bukke)**
**Joint Charity Commissioner,**
**Pune Region, Pune.**

Date: 12/04/2023.
Pune.

दिनांक १२ मार्च २०२३ रोजी माननीय सह-धर्मादाय आयुक्त यांनी **Ex-Parte** निकालातून ट्रस्ट कार्यकारिणीवर काही बंधने घातली. महत्वाचे : ह्या निकालाच्या सुनावणीमध्ये ट्रस्ट कार्यकरणीचे म्हणणे प्रस्तुत नाही.

---

तथाकथित गाजलेला (नव्हे.. मुद्दाम गाजवलेला) मनाई हुकूम **रद्द झाल्याचा आदेश**

**ORDER**

1. The application No.53 of 2023 is allowed.
2. The order dated 12.04.2023 in application No.64 of 2022 is set aside and application No.64 of 2022 is restored.
3. The exparte order dated 27.02.2023 in application No. 64 of 2022 is set aside and applicants are directed to file their reply within 15 days of their appearance.
4. Both the parties shall appear before this authority on 28.08.2024.
5. Parties to bear their own costs.

**Sd/-**
**(R. K. Kshirsagar),**
Joint Charity Commissioner,
Pune Region, Pune.

Place :- Pune
Date :- 22/07/2024.

आम्हाला सांगायला आनंद वाटतो कि, दिनांक २२ जुलै २०२४ रोजीवरील तथाकथित मनाई आदेश रद्द झाला.   महत्वाचे : विरोधकांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी देण्यात आली.

CHARITY ORGANISATION

फौजदारी गुन्हा क्रमांक ३६०४ / २०२२

विरोधकांनी ट्रस्ट कार्यकारिणी वर स्टॅम्प, लेटर पॅड, इतर साहित्य वापरले, या बद्दल फौजदारी गुन्ह्याची खासगी केस दाखल केली . परंतु

श्री मनोज आरसीध्द हे केस चालविण्यासाठी स्वतः अध्यक्ष असल्याचा पुरावा दाखल करू न शकल्याने हि केस चालविण्याचा हक्क गमावून बसले.

तसेच मा. कोर्टाने हे प्रकरण दिवाणी स्वरूपाचे असल्याने फौजदारी गुन्हा चालवू शकत नाही, असा निकाल देऊन हि फौजदारी गुन्हयाची केस रद्द केली.

मा. कोर्टाचा आदेश

6] That apart, complainant Mr. Manoj Aarsiddh is claiming himself to be the chairman of the trust. However, no resolution of the alleged trust appears to have been filed on record thereby authorising him to proceed with the present complaint and to prosecute the accused as such.

7] In view of the above discussion, it is clear that the matter necessarily involves the issues of complex civil nature. Hence, by no stretch of imagination, any offence, muchless the offences under Sections 420, 467, 468, 472, 473 read with Section 34 of IPC have been prima-facie made out. In the result, following order is hereby passed:

**ORDER**

[1] The complaint stand dismissed vide Section 203 of Criminal Procedure Code.

sd/- 11/7/23

(S.R. Totla)

Date: 11.07.2023. Addl.Chief Judicial Magistrate, Pune.

## युको बँक (तथाकथित घोटाळा) प्रकरण

विरोधकांनी पोलिसांपासून अनेक तथ्ये लपवून, वकिलांना पेमेंट केल्याबद्दल गुन्हा (FIR) दाखल केला.

आपल्या कार्यकारिणीने मा. उच्च न्यायालयात दाद मागितली व त्यातून अंतरिम आदेश मिळविला.

### मा. उच्च न्यायालयातील कोर्ट ऑर्डरचा भाग

complaint and to prosecute the accused. The matter involves the issues of complex civil nature and hence, by no stretch of imagination, any offences are made out. The Complaint was dismissed vide order dated 11th July, 2023. However, thereafter, the FIR has been registered on 11th December, 2023. Apparently, there is no reference of Order dated 11th July, 2023 passed by the Learned Additional Chief Judicial Magistrate, Pune dismissing the complaint.

4. Issue notice to Respondent No.2, returnable on 19th June, 2024.

5. Considering the peculiar facts of the case, we direct that though investigation may proceed, charge-sheet shall not be filed against the Petitioners.

**( N.R. BORKAR, J. )** **( PRAKASH D. NAIK, J. )**

उच्च न्यायालयाचे निरीक्षण **:** हे प्रकरण गुंतागुंतीचे असून दिवाणी स्वरूपाचे आहे**,** त्यामुळे फौजदारी गुन्हा नोंदविता येत नाही**.** अगोदर रद्द झालेल्या केस ची माहिती नवीन **FIR** करताना पोलिसांपासून दडवून ठेवण्यात / वगळण्यात आलेली आहे**.** त्यामुळे आमच्यावर कोणतेही आरोपत्र दाखल करण्यापासून पोलिसांना रोखलेले आहे**.** तथापि तपास सुरु राहील**.**

अजून एक अति महत्वाचे **:** हि **FIR** खडक पोलीस स्टेशन मधून पारित झाली**,** परंतु आजतागायत ट्रस्ट कार्यकारिणीला खडक पोलीस स्टेशन मध्ये बोलावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आलेली नाही**.**

ह्या सर्व प्रकारातून हेच सिद्ध होते कि,
साम, दाम, दंड भेद, ह्याही पुढे जाऊन
तथ्ये तोडून, मोडून, लपवून,
व्हाट्सअॅप वर यथेच्छ बदनामी करून,
खोट्या फौजदारी गुन्ह्यांची भीती दाखवून,
रोज शिवीगाळ, अपशब्दांची बक्षिसे देऊन,
सामाजिक गैरसमज पसरवून,
खोट्या आरोपांचा भडीमार करून,
ट्रस्टचे कार्यक्रमांना अनंत अडचणी आणून,
मुलाबाळांच्या लग्नाची अनामिक भीती दाखवून,
समाजातून हाकलून देण्याची धमकी देऊन,
हे सर्व प्रकार व्यवस्थित झेलून
ट्रस्ट कार्यकारणी आता यातून
तापून सलाखून निघालेली आहे. हे नम्रपणे कळावे.

इंग्रज हे क्रांतीकारकांना १५० वर्ष जुलूम करून सुद्धा संपवू शकले नाहीत, शेवटी इंग्रजांना पळून जावे लागले.
त्याच क्रांतिकारकांपासून प्रेरणा घेतलेल्या कार्यकारिणीला संपविणे शक्य नाही.

फक्त एक फरक आहे, इंग्रज कायदा पाळायचे. आजकालचे विरोधक कायद्याचा गैरवापर करतात. (आता आम्हाला त्याची सवय झाली आहे)

# ● अंतिम निर्वाणीचा इशारा ●

● पहिला निर्वाणीचा इशारा : दिनांक १६ मार्च २०२२ रोजी आम्ही सर्व साधारण सभा घेत आहोत हे कळविले होते. त्या सभेअगोदर एकत्र बसून मार्ग काढला असता तर पुढील सभा टळली असती. परंतु एकत्र येऊन मार्ग काढायच्या ऐवजी सभेच्या एक दिवस अगोदर स्वारगेट येथे वेगळीच मिटिंग बोलावून व्यक्तिगत दोषाने बाधित, निरर्थक भाषणे आणि बॅनर वर बिनकामाच्या सह्या घेण्याचा कार्यक्रम झाला.

●●दुसरा निर्वाणीचा इशारा : दिनांक ५ मे २०२२ रोजी **Final Call** द्वारे समाज्याच्या सर्व ग्रुपवर निर्वाणीचा इशारा देताना, कार्यकारिणीने बदल अर्ज दाखल करण्याच्या एक आठवडा अगोदर समाजातील काही जिज्ञासू बांधवांना प्रत्यक्ष भेटून मध्यस्थी करून मार्ग काढण्याची विनंती केली. परंतु आमच्या ह्या विनंतीकडे साफ दुर्लक्ष करण्यात आले.

सध्या अनेक कोर्ट केसेस **अत्यंत चुकीच्या पद्धतीने** लढल्या जात आहेत. अनेकांच्या विश्वाहर्तेवर शंका उपस्थित होत आहेत. अश्या चुकीच्या कोर्ट केसेस मुळेच समाजाचे अतोनात नुकसान झालेले आहे.

●●●**अंतिम निर्वाणीचा इशारा :** आज हा अहवाल आपले हातात देताना संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आम्ही पुन्हा एकदा अंतिम निर्वाणीचा इशारा देत आहोत, सभेनंतर १५ दिवसांचे आत एकत्र येऊन मार्ग काढला नाही तर .... नाईलाजाने ट्रस्ट कार्यकारिणीला संस्थेच्या हितासाठी  योग्य ती न्यायिक पाऊल उचलावे लागणार आहे.  **ज्याने समाजातील सर्व केसेसची दिशा पूर्णपणे बदलेल.**

बुक पोस्ट

प्रति,

______________________

______________________

______________________

# श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज ट्रस्ट, पुणे. A-१६

**कार्यालय :** ५७६ गुरुवार पेठ, पुणे. ४११०४२ आणि ४९७, ४९९, ५०० घोरपडे पेठ, पुणे. ४११०४२

Website : www.ssksamajtrust.com

Email : ssksamajtrust@gmail.com

तुमचे प्रेम या आशीर्वाद सदैव असो.